# ठक्कर यांचे आत्मचरित्र प्रेरणादायी - पाटील



मनोहरदास ठक्कर यांच्या आत्मचरित्रपर पुस्तकाचे प्रकाशन करताना वनाधिपती विनायकदादा पाटील. समवेत ठक्कर समूहाचे अध्यक्ष जितेंद्रभाई ठक्कर, गौरव ठक्कर, राजेंद्र ठक्कर, मनोहरदासजी ठक्कर, मंजुळाबेन ठक्कर, महाव्यवस्थापक नरेंद्रभाई ठक्कर, निशांत ठक्कर

**नाशिक । व्यापार प्रतिनिधी**

जीवनाच्या विविध अंगांना स्पर्श करणारे व अनुभवातून साकारलेले मनोहरदासजी ठक्कर यांचे आत्मचरित्र वाचणाऱ्याला प्रेरणा देणारे असून शाश्वत सत्याचा अविष्कार त्यातून साधला गेला आहे. साधेपणा आणि प्रांजळ कथन हे या आत्मचरित्राचे वैशिष्ट्य असल्याचे प्रतिपादन वनाधिपती विनायकदादा पाटील यांनी केले. पाटील मनोहरदास ठक्कर यांच्या आत्मचरित्र प्रकाशन सोहळ्यात बोलत होते.

आत्मचरित्रातील प्रेरणादायी घटनांचा गौरवपूर्ण उल्लेख करतांना ते म्हणाले की वयाच्या अवघ्या दाहव्या वर्षी मनोहरदास नाशिकला आले. कष्टातून उभे राहिले. सुरुवातीला पत्नी मंजुळाबेन यांच्याबरोबर संसाराचा गाडा चालवत असताना एकच पातेले त्यांच्याकडे होते. त्यातूनच एकापाठोपाठ एक अन्नपदार्थ शिजवून त्यांनी दिवस काढले. काळाच्या ओघात भांडी बदलली पण पदार्थ तेच राहिले. याचे पूर्ण आकलन मनोहरदासजींना झाले असल्याने ते स्थितप्रज्ञ राहिल्याचेही पाटील यांनी यावेळी सांगितले. 'तुझे आहे तुजपाशी' या न्यायाने ते मार्गक्रमण करीत राहिले.त्यामुळेच इतरांसाठी ते एक आदर्श व्यक्तिमत्त्व बनले. ज्ञानी माणसे अनेक असतात, पण समजदार माणसे कमी असल्याचे सांगत मनोहरदासजी हे समजदार व्यक्तिमत्त्वांमध्ये समाविष्ट होतात असा गौरवपूर्ण उल्लेखही पाटील यांनी केला. ठक्कर परिवाराशी स्नेह असलेले विधिज्ञ एस.एल.देशपांडे म्हणाले की मनोहरदासजींना धार्मिकता, सात्विकता आणि प्रमाणिकता यांचा वारसा कुटुंबातूनच मिळाल्याने व्यावसायाच्या विकासासाठी त्यांनी तोच संस्कार वापरला. कायद्याच्या चौकटीत राहून प्रामाणिक व्यवहार केल्याचेही देशपांडे म्हणाले. यावेळी प्राचार्य केजन देसाई, खुशालभाई पोद्दार, रमेश महाशब्दे यांचे विचार लघुपटाच्या माध्यमातून दाखवण्यात आले. हॉटेल एक्स्प्रेस इनच्या सभागृहात झालेल्या या समारंभास ठक्कर समूहाचे अध्यक्ष जितेंद्र ठक्कर, नरेंद्र ठक्कर, अभिषेक ठक्कर, राजेंद्र ठक्कर, निशांत ठक्कर आदी उपस्थित होते. या आत्मचरित्राचे शब्दांकन आनंद क्षेमकल्याणी यांनी, संपादन रविंद्र साकुरीकर यांनी तर डिझाईनिंग मिडास् टचचे श्रीकांत नागरे यांनी केले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंजना जोशी यांनी केले.